**35**

# महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक विचार

डॉ.डोंगरे एल.बी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर जि.नांदेड.

***********

१९ व्या शतकातील एक युग प्रवर्तक म्हणुन महात्मा ज्योतीबा फुले यांचे नांव अग्रणी आहे. भारतातील तत्कालीन सामाजिक समस्याच्या खोलात जावून त्यांचे शास्त्रीय विश्लेषण करुन त्यावरील उपाय सुचविण्याचे काम महात्मा फुले यांनी केले. महात्मा फुले हे बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते. महात्मा फुले यांनी तत्कालीन सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करुन त्यासंबंधी आपले क्रांतीकारी विचार मांडणारे पहिले विचारवंत होते. म्हणून त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना महात्मा, क्रांतीसुर्य, युग प्रवर्तक असे संबोधले जाते. त्यांच्या या उपाध्यावरुन त्यांच्या कार्याची महती कळून येते. महात्मा फुले यांनी वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, अस्पृश्यता, धर्म, शिक्षण, शेती, संस्कृती, इतिहास यावर अभ्यासपूर्वक आपले विचार मांडले. यापैकी महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार हे क्रांतीकारी आणि परिवर्तनवादी आहेत. ज्ञान ही एक शक्ती आहे. शिक्षण समाजपरिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणाचे मानवी जीवनातील महत्त्व ओळखून महात्मा फुले यांनी तत्कालीन समाजात ज्या समाजाला शिक्षणाचे हक्क नाकारला अशा समाजासाठी महात्मा फुले यांनी पुढाकार घेतला होता. मानसिक आणि आर्थिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी हत्यार आहे. यावर महात्मा फुले यांचा विश्वास होता. म्हणुन महात्मा फुले यांनी शुद्र मुलामुलींना शाळेत घालावे / सुशिल करावे सर्वकामी अशी भुमिका घेतली. महात्मा फुले यांनी हंटर कमीशनपुढे साक्ष देतांना सांगीतले की, १२ वर्षापर्यंतच्या सर्व मुलामुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे मोफत करण्याची सुचना केली होती. महात्मा फुले यांनी शिक्षणासारखे पवित्र कार्य करण्यासाठी अशिक्षीत पत्नीला शिक्षित करुन त्यांच्या सहकार्याने पुण्याच्या बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाडयात मुलींची पहिली

शाळा काढली. भारतीयांनी भारतीयांसाठी प्रवेश देणारी पहिली शाळा महात्मा फुलेंनी सुरु केली.

महात्मा फुले यांनी काढलेल्या शाळेला सनातन्यांनी भरपुर विरोध केला. पण महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दाम्पत्यांनी हे ज्ञानदानाचे पवित्र कार्य कोणत्याही आव्हानाला, संकटाला न घाबरता अविरत चालू ठेवले. महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व विशद करतांना म्हणतात.

चविद्ये विना मती गेली । मती विना निती गेली
निती विना गती गेली । गति विना वित्त गेले
वित्ता विना शुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केलेछ

शिक्षण ही मानवाची आवश्यक गरज आहे. शिक्षणाशिवाय मानवाचा सर्वांगीण विकास होवू शकत नाही. याची जाणीव महात्मा फुले यांना होती. म्हणुन महात्मा फुले यांनी शिक्षण ही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. ती मक्तेदारी महात्मा फुले यांनी शैक्षणिक चळवळीच्या माध्यमातून मोडीत काढली.

तत्कालीन ब्रिटिश शासनाने निर्माण केलेली शिक्षणव्यवस्था महात्मा फुले यांना मान्य नव्हती. ब्रिटिशांनी आपली राजकीय सत्ता सुरक्षीत राहावी यासाठी वरच्या वर्गाला शिक्षण दिल्यास खालच्या वर्गापर्यंत त्या शिक्षणाचा प्रचार प्रसार होईल असा शिक्षणाचा झिरपणारा सिध्दांत मांडला. हा सिध्दांत महात्मा फुले यांना मुळीच मान्य नव्हता. या सिध्दांतास महात्मा फुले यांनी कडाडून विरोध केला. महात्मा फुले यांच्या मते प्रत्येक मानवास शिक्षण घेण्याचा समान अधिकार आहे. बुध्दी आणि शिक्षण घेण्याची क्षमता मानवास जन्मजात नसते तर परिश्रमाने मिळवता येते. हे महात्मा फुले यांच्या शिक्षण विषयक विचाराचे गमक आहे.

महात्मा फुले यांनी शिक्षण विषयक विचारात स्त्री शिक्षणाला अग्रस्थान दिले होते. स्त्री-पुरुष समान शिक्षणाचे समर्थन करणारे महात्मा फुले हे पहिले विचारवंत आहे. समाजक्रांतीचे पहिले शस्त्र म्हणुन महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले आहे. तत्कालीन समाजात स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे महापातक केल्यासारखे होते. अर्थात समाजाचा, वर्णव्यवस्थेचा, जातीव्यवस्थेचा स्त्री शिक्षणास विरोध होता.

समाजातल्या सनातनी विचारांना मुठमाती देवून महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचे पवित्र कार्य हाती घेतले. स्त्रिया शिक्षीत झाल्यास मुलांवर चांगले संस्कार होवून मुलांचे भवितव्य घडण्यास मदत होते. स्त्रीयांमुळे समाजाचा व राष्ट्राचा विकास घडून येतो यावर महात्मा फुले यांचा ठाम विश्वास होता. महाराष्ट्रातूनच नव्हे तर सबंध भारतात स्त्री शिक्षणाची दारे खुली करणारे, स्त्री शिक्षणासाठी संघर्ष करणारे, स्त्री शिक्षणाचे समर्थन करणारे, स्त्री शिक्षणाचे महत्त्व जाणणारे महात्मा फुले हे भारतातील पहिले विचारवंत होते

महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाबरोबरच दलित अस्पृश्यांच्या शिक्षणालाही महत्त्वाचे स्थान दिल्याचे दिसून येते. विषमतेची बिजे रोवणाज्या मनु प्रणित व्यवस्थेने अस्पृश्यांना, शुद्रादिशुद्रांना शिक्षणाची दारे बंद केली होती. अशा या अस्पृश्य, शोषीत, वंचित समाज परंपरेने लादलेल्या गुलामीत गावकुसाबाहेर असणाज्या समाजाच्या उत्थानाचे कार्य महात्मा फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचे कार्य केले.

अविद्या हे सर्व समस्यांचे मुळ आहे. असे स्पष्ट केले. दलित, शोषीत, वंचिताचे दु:ख, दैन्य, दारिद्रय संपुष्टात आणण्यासाठी शिक्षण हाच एकमेव पर्याय त्यांना दिसला. शुद्रातिशुद्रांना गुलामीतून मुक्त करण्यासाठी पुण्याच्या नानापेठेत १८५७ रोजी अस्पृश्यांची पहिली शाळा काढली. अस्पृश्यांच्या मुलांना शिकवण्यासाठी वरिष्ठ जातीतील शिक्षकाऐवजी खालच्या जातीतील शिक्षक नेमून ज्ञानदानाचे कार्य केले. तत्कालीन प्रस्थापित व्यवस्थेला हादरे देवून महात्मा फुले यांनी शुद्रातिशुद्रांना शिक्षणाचा हक्क मिळवून दिला होता. म्हणुनच मनाने मिळालेल्या, शरीराने गुलाम बनलेल्या आणि संवेदनेने बधिर झ् ालेल्या माणसाला शिक्षणाच्या माध्यमातून आत्मसन्मान मिळवून देण्याचे काम महात्मा फुले यांनी केले. याच शिक्षणाच्या माध्यमातून तमाम दलित शोषीतांचे आयुष्य उजळून निघाले. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षण शुद्रादिशुद्रांना शिक्षणाबरोबरच कुटुंबातील प्रौढ व्यक्तींना शिक्षण देण्यासाठी प्रौढ शिक्षणाची चळवळ चालवली. कुटुंबातील कर्त्या स्त्री-पुरुषांना शिक्षण दिले तर शिक्षणाची चळवळ अधिक गतिमान होईल

अशी धारणा महात्मा फुले यांची होती. म्हणुन त्यांनी रात्री दोन-तीन तास प्रौढ स्त्री-पुरुषांना शिक्षणासाठी महात्मा फुले यांनी इ.स.१८५५ मध्ये आपल्या घरीच रात्र शाळा सुरु केली. म्हणुन महात्मा फुले यांची शिक्षण विषयक विचारांची दृष्टी दिसून येते.

महात्मा फुले यांचा शिक्षण विषयक विचार कृतिशील व समाजाला उत्कर्षाच्या दिशेने घेवून जाणारा आहे. महात्मा फुले यांनी सर विल्यम हंटर कमीशन समोर जी साक्ष दिली त्यात

त्यांचा शिक्षणासंबंधीच्या व्यापक दृष्टीकोनाचे दर्शन होते. हजारो वर्ष गुलामीत खितपत पडलेल्या स्त्रीयांना अस्पृश्यांना शिक्षणाच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी व्यापक अशी सामाजिक क्रांती केली. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक चळवळीमुळे स्त्रीयांना, शुद्रांना हक्क, स्वातंत्र्य, सन्मान, प्रतिष्ठा मिळवून दिली. महात्मा फुले यांनी आपले शिक्षण विषयक विचार अंखद, मंगलाष्टक, हंटर कमीशन, मेकॉलेचा झिरपता सिध्दांत यातून त्यांचे शैक्षणिक विचार प्रतिबिंबीत होतात. महात्मा फुले यांनी व्यवहारीक शिक्षण, सक्तीचे मोफत शिक्षण, स्त्री शिक्षण, शुद्रादिशुद्रांना शिक्षण, प्रौढ शिक्षण, शेतकरी कामगारांबाबतच्या शिक्षणाविषयी व्यापक मुलगामी क्रांतीकारी विचार मांडले.

संदर्भग्रंथ :-

१) डॉ.अनिल कठारे महाराष्ट्रातील समाज सुधारक, विद्या बुक, औरंगाबाद.

२) डॉ.सुनंदा जामकर महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक विचार, नभ प्रकाशन.

३) धनंजय कीर महात्मा ज्योतीबा फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

४) डॉ.दुश्यंत कठारे युगप्रवर्तक क्रांतीबा, युगप्रवर्तक प्रकाशन, लातूर.

❑❑❑